# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-03.05.2026** **वार- रविवार**

---

**शुक्ला**

पुण्यातील आर्मी पब्लिक स्कूलमध्ये आयोजित एका सत्रात अशोक चक्र विजेते आणि अंतराळवीर ग्रुप कॅप्टन सुभांशू शुक्ला यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधला. राष्ट्रगौरवाची भावना वाढवणं आणि संरक्षण सेवा तसंच अंतराळ संशोधन या क्षेत्रांमध्ये आवड निर्माण करण्याचा यामागे उद्देश होता. ग्रुप कॅप्टन शुक्ला यांनी राष्ट्रीय संरक्षण अकादमीतून भारतीय वायु दलातील आपल्या पदांपर्यंत पोहोचण्याचा प्रवास विद्यार्थ्यांना सांगितला.

हा प्रवास "अढळ वचनबद्धता आणि कठोर तयारी"नेच शक्य झाला असं त्यांनी सांगितलं. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ग्रुप कॅप्टन शुक्ला यांनी येत्या दशकात भारत अंतराळवीरांची एक मोठी तुकडी तयार करणार असून, त्यामुळं तरुणांसाठी करिअरच्या अभूतपूर्व संधी निर्माण होतील, असं सांगितलं.

**अग्नि-सुरक्षा-सप्ताह**

देशातील आरोग्य सेवा सुविधांमध्ये आगीच्या धोक्यांना प्रतिबंध आणि निवारण करण्याच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्यासाठी, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय—सर्व राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि संबंधित केंद्रीय मंत्रालयं आणि विभागांच्या सहयोगानं—उद्यापासून संपूर्ण देशभरात ‘अग्नि सुरक्षा सप्ताह’ साजरा करणार आहे. या उपक्रमांतर्गत, राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांद्वारे जनजागृती मोहिमा, प्रात्यक्षिक सराव, क्षमता-बांधणीचे उपक्रम आणि अग्नि सुरक्षिततेसंबंधीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा प्रसार यांसारखे विविध उपक्रम हाती घेतले जातील.

**बालक-मधुमेह**

केंद्र शासनानं बालकांमधील मधुमेहावरील मार्गदर्शनपर दस्तऐवज प्रकाशित केला आहे. सार्वजनिक आरोग्य सेवा वितरणातील सर्वोत्तम पद्धतींवरील नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय शिखर परिषदेत हा दस्तऐवज प्रकाशित करण्यात आला. या मार्गदर्शनपर दस्तऐवजाद्वारे बालकांमधील मधुमेहाची तपासणी, निदान, उपचार आणि दीर्घकालीन व्यवस्थापनासाठी प्रथमच एक संरचित आणि प्रमाणित राष्ट्रीय चौकट स्थापित करण्यात आली आहे असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे. बालकांमधील मधुमेहाची काळजी सार्वजनिक आरोग्य प्रणालीमध्ये समायोजित केली आहे अशा देशांमध्ये भारताला आता स्थान मिळालं आहे.

यामुळं महत्त्वाचे सार्वजनिक आरोग्य फायदे मिळण्याची अपेक्षा आहे, त्यामध्ये लवकर निदान झाल्यामुळं मृत्यूदरात घट, गुंतागुंत टाळणं आणि बाधित मुलांच्या जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा यांचा समावेश आहे.

या नवीन मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश जन्मापासून ते १८ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांसाठी सार्वत्रिक आरोग्य तपासणी सुनिश्चित करणे हा आहे, या उद्देशासाठी लवकर निदानाकरिता समुदाय आणि शाळा या दोन्ही माध्यमांचा वापर केला जाईल. संशयित रुग्णांची तत्काळ रक्तातील ग्लुकोजची चाचणी करुन पुष्टी आणि उपचारांसाठी त्यांना त्वरित जिल्हा आरोग्य केंद्रांमध्ये पाठवलं जाईल.

**दिव्यांग**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि दिव्यांग भवन फाऊंडेशन यांच्या वतीनं "मिशन संधी आरंभ" या उपक्रमाचं आयोजन उद्या करण्यात आलं आहे. दिव्यांग बांधवांसाठी स्वयंपूर्ण आणि शाश्वत नोकरी देणारी परिसंस्था उभारण्याच्या उद्देशानं वर्षभर चालणाऱ्या मोहिमेची ही सुरुवात आहे.
मिशन संधी आरंभ अंतर्गत कॉर्पोरेट क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, एचआर, सीएसआर प्रमुख, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते तसंच शासकीय अधिकारी यांना दिव्यांग समावेशन आणि रोजगार या विषयावर संवादासाठी एकत्र आणण्यात येणार आहे. हा उपक्रम केवळ चर्चेपुरता मर्यादित नसून, प्रत्येक सहभागी संस्थेकडून दिव्यांगांच्या उपजीविकेसाठी औपचारिक प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे.

**यशस्वी संस्था वर्धापनदिन**

एखादी संस्था मोठी होत असताना आधीच्या पिढीनं ज्या विचारानं ती संस्था सुरू केली तो विचार नवीन पिढी तितक्याच ताकदीनं नव्या जोमानं पुढे नेत असेल तर अशा संस्थांचे कार्य निश्चितच भव्य दिव्य होतं असं मत लेखक आणि चित्रपट दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी व्यक्त केलं. कौशल्य विकास क्षेत्रात देशपातळीवर काम करणाऱ्या यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स संस्थेच्या 42 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. यशस्वी संस्थेनं सुरू केलेल्या शिका आणि कमवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील वाड्या वस्त्यांमधील बेरोजगार युवक युवतींना रोजगारक्षम करण्याचं महत्त्वाचं काम होत आहे म्हणूनच अशा संस्थेचा सदिच्छा दूत होण्याची जबाबदारी आपण स्वीकारली असंही तरडे यावेळी म्हणाले. याप्रसंगी यशोगाथा या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले या कार्यक्रमाला यशस्वी संस्थेचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी, वरिष्ठ अधिकारी तसंच पुणे जिल्ह्यातील विविध नामांकित औद्योगिक कंपन्यांचे वरिष्ठ मनुष्यबळ व्यवस्थापक अधिकारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आजपासून पुढील तीन दिवस आकाश निरभ्र राहून कमाल तापमान 38 अंश तर किमान तापमान 20 अंश सेल्सियसच्या आसपास राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**